**जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग**
मुख्य प्रशासकीय इमारत, पहिला मजला, ओरोस-सिंधुदुर्गनगरी,
ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग, पिनकोड - 416 812
दुरध्वनी क्रमांक - 02362 - 228589, फॅक्स क्रमांक - 02362 - 228844

**संकेतस्थळ - www.sindhudurg.gov.in** **ईमेल- collroffice@gmail.com**

क्रमांक गृह.फौज.संहिता/१४४/२०२० दिनांक -२१/०४/२०२०

**वाचले-**

1) फौजदारी प्रकीया संहिता १९७३ चे कलम १४४
2) या कार्यालयाकडील आदेश क्र. गृह. फौज.संहिता/१४४/२०२० दि. २२/०३/२०२०
3) या कार्यालयाकडील आदेश क्र. गृह.फौज.संहिता/कावि ८५/१४४/२०२० दि. २५/०३/२०२०
4) केंद्र शासनाकडील आदेश क्र. 40-3/2020 DM-I(A) दिनांक १५ एप्रिल, २०२०
5) महाराष्ट्र शासनाकडील आदेश NO DMU/2020/CR 92/DisM-1 दिनांक १७ एप्रिल, २०२०
6) महाराष्ट्र शासनाकडील आदेश NO DMU/2020/CR 92/DisM-1 दिनांक १८ एप्रिल, २०२०

---

## फौजदारी प्रकीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश सुधारणा -२

ज्याअर्थी, कोरोना विषाणूचा (कोव्हीड -१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथ रोग प्रतिबंधक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

संदर्भ क्र. २ व ३ अन्वये सिंधुदुर्ग जिल्हयात कोरोना विषाणूचा (कोव्हीड -१९) प्रादुर्भाव व प्रसार टाळण्याच्या दृष्टीने फौजदारी प्रकीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत व सदर आदेशान्वये अत्यावश्यक सेवा देणा-या आस्थापनांना वगळून ५ किंवा ५ पेक्षा जास्त लोक सार्वजनिक ठिकाणी एकत्र येणेस तसेच वाहतूक करणारी वाहने यांना ये-जा करणेस प्रतिबंध केलेला आहे.

आता संदर्भ क्र. ४ व ५ अन्वये अनुक्रमे केंद्रशासन व राज्यशासनाने काही शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, औद्योगिक आस्थापना व खाजगी व्यवसाय, या बंद ठेवलेल्या आस्थापनांना काही अटी व शर्तीवर व कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होणार नाही अशाप्रकारच्या उपाययोजना करून सुरू ठेवणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्या अनुषंगाने राज्यशासनाने दिनांक १७/०४/२०२० च्या आदेशानुसार सुधारीत मार्गदर्शक सूचनान्वये शिथीलता आणली आहे.

त्याअर्थी संदर्भ क्र. ४, ५ व ६ च्या केंद्र शासन व राज्य शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी करणेच्या दृष्टीने यापुर्वी संदर्भ क्र. २ व ३ अन्वये फौजदारी प्रकीया संहिता १९७३ चे कलम १४४ नुसार आदेश पारीत केलेल्या आदेशामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे, अशी माझी खात्री झाली आहे.

**सबब, मी के. मंजुलक्ष्मी, जिल्हादंडाधिकारी, सिंधुदुर्ग सदर आदेशान्वये आदेशित करते की, संदर्भ क्र. २ व ३ अन्वये फौजदारी प्रकीया संहिता १९७३ चे कलम १४४ ने लागू केलेले प्रतिबंध संदर्भ क्र. ४, ५ व ६ च्या आदेशान्वये मुभा देण्यात आलेल्या बाबींना लागू होणार नाहीत.**

सदरचा आदेश आज दिनांक २१/०४/२०२० रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला आहे.

**(के.मंजूलक्ष्मी)**
**जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी**
**सिंधुदुर्ग.**

प्रत माहितीसाठी तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

1) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग
2) पोलीस अधिक्षक,सिंधुदुर्ग
3) उपविभागीय अधिकारी कणकवली /कुडाळ / सावंतवाडी
4) तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी (सर्व)
5) उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, सिंधुदुर्ग
6) पोलीस निरीक्षक, राष्ट्रीय महामार्ग,
7) जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग
8) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई यांजकडे राजपत्रात प्रसिध्दीसाठी